शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**महोदय/महोदया,**

शासकीय सोयी/सुविधाकरीता शपथपत्रांऐवजी स्वघोषणापत्र व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती स्वीकारणेच्या अनुषंगाने मा.कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी पाठविलेले क्र:संकीर्ण-२०१५/प्र.क्र.१२४-१५/आस्था-२, दि.०६/०३/२०१७ चे पत्र व सदर पत्रासोबतचे मा.अपर मुख्य सचिव (प्र.सु.व र.व का.), महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय(विस्तार), कक्ष क्र.६३१, मुंबई यांचे क्र:प्रसुधा १६१४/प्र.क्र.७१/१८-अ(भाग३), दि.१६ फेब्रुवारी, २०१७ चे पत्र आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाही अग्रेषित केले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

कळावे,

आदेशान्वये,

I/C उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/226
दि. 18 MAR 2017

महाराष्ट्र शासन

E-mail-rajendra.jadhav62@nic.in
दूरध्वनी क्र.०२२ २२८५५७६६

क्र : संकीर्ण-२०१५/प्र.क्र.१२४-१५/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
४३१ (विस्तार), ४ था मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ६.३.२०१७

प्रति,

संचालक ( उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालय ), महाराष्ट्र राज्य.
कुलगुरु, सर्व अकृषिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
उपसचिव (महाविद्यालयीनशिक्षण/विद्यापीठशिक्षण/तंत्रशिक्षण/कला / ग्रंथालये ),
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

विषय : शासकीय सोयी/ सुविधाकरीता शपथपत्रांऐवजी स्वघोषणापत्र व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती स्वीकारणे.

संदर्भ : १) शासनपत्र समक्रमांकित दिनांक १३.१०.२०१६, दि. २५.१०.२०१६ व दिनांक १४.१२.२०१६ रोजीची पत्रे.
२) समक्रमाकाचे दि.४.१.२०१७ चे पत्र.
३) अप्पर मुख्य सचिव (प्र.सु व र व का.) यांचे दि.१६ फेब्रुवारी,२०१७ चे पत्र.

सामान्य प्रशासन विभागाचे अप्पर मुख्य सचिव ( प्र.सु.व र.व का. ) यांचे दिनांक १६ फेब्रुवारी,२०१७ चे पत्र तसेच आढावा बैठकीसाठी मागितलेल्या माहितीचे विवरणपत्र सोबत पाठविण्यात येत आहे.

विविध सेवा / सुविधासाठी अर्ज करतांना अर्जदाराकडून विद्यमान अधिनियम / नियमानुसार आवश्यक असेल अशा बाबींखेरीज इतर बाबींकरीता शपथपत्रे व साक्षांकित प्रती ऐवजी स्वघोषणापत्र व स्वयंसाक्षांकित प्रती स्विकारण्याबाबत दि.९.३.२०१५ च्या परिपत्रकानुसार सूचना देण्यात आलेल्या आहेत. या संदर्भात प्रशासकीय सुधारणेचा भाग म्हणून पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.
१) नागरिकांना पुरविण्यात येणा-या सेवा / सुविधांचे अर्जांचे नमूने सोपे करावेत व कोणताही अर्ज एका पानापेक्षा अधिक नसावा. २) अर्जासोबत अर्जदाराकडून आवश्यक ती किमान माहिती घेतली जावी. ३) विभागाच्या विविध कार्यालयांमध्ये/आस्थापनेकडे

विविध सेवा / सुविधांसाठी करावे लागणारे अर्जाचे नमुने एकत्रित करुन त्यामध्ये सुधारणा करण्यात याव्या.

अर्जाचे सुलभीकरण करुन माहिती सादर करण्याबाबत वारंवार कळविण्यात आले आहे. परंतु याबाबत अद्यापपर्यंत कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करुन दोन ही विवरणपत्रातील माहिती मा. अप्पर मुख्य सचिव (प्र.सु.व र व का) यांना पाठविण्यासाठी त्वरीत उपलब्ध करुन देण्यात यावी.

( रा.वि.जाधव )
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

३८०

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), कक्ष क्र. ६३१, मुंबई- ४०००३२.

दूरध्वनी क्र. (०२२) २२७९ ४२२८
Website: maharashtra.gov.in

क्र: प्रसुधा १६१४/प्र. क्र.७१/१८-अ (भाग३) दिनांक : १६ फेब्रुवारी, २०१७.

प्रति,

अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
सर्व मंत्रालयीन विभाग ,
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२

अ. मु. स.
उच्च व तंत्र शिक्षण
यांचे कार्यालय
क्र. २३१
दि. 27-2-17

**विषय:** शासकीय सोयी/सुविधाकरिता शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती स्विकारणेबाबत

**संदर्भ:** १) उपरोक्त विषयाबाबतचे शासन परिपत्रक दि. ९ मार्च, २०१५
२) उपरोक्त विषयाबाबतचे समक्रमांकाचे दि.२५.०७.२०१६ चे पत्र व दि.२०.१०.२०१६ व ११.११.२०१६ चे स्मरणपत्र.

महोदय/ महोदया,

उपरोक्त संदर्भ क्र. १ येथील शासन परिपत्रक दि. ९.३.२०१५ अन्वये विविध सेवा/सुविधांसाठी अर्ज करतांना अर्जदारांकडून विद्यमान अधिनियम/नियमानुसार आवश्यक असेल अशा बाबी खेरीज करुन इतर बाबीकरिता शपथपत्रे व साक्षांकित प्रती ऐवजी स्वघोषणापत्र व स्वयंसाक्षांकित प्रती स्वीकारण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

२. यासंदर्भात प्रशासकीय सुधारणेचा भाग म्हणून आपण पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी अशी विनंती आहे.

(१) नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा/सुविधांचे अर्जाचे नमूने सोपे करावेत व कोणताही अर्ज एकापानापेक्षा अधिक नसावा.

(२) अर्जासोबत अर्जदाराकडून आवश्यक ती किमान माहिती घेतली जावी.

(३) विभागाच्या विविध कार्यालयांमध्ये /आस्थापनाकडे विविध सेवा/सुविधांसाठी करावे लागणारे अर्जाचे नमूने एकत्रित करून त्यांमध्ये सुधारणा करण्यात याव्यात.

DSIK
समन्वय
१
८/३/२
श्री पडोळे
डायरेक्टर
इते
3/3/17

३. अर्जाचे सुलभीकरण करुन माहिती सादर करण्याबाबत संदर्भाधीन पत्रांन्वये कळविण्यात आले आहे. परंतु याबाबत आपल्याकडून अजून कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. तरी यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही लवकरात लवकर करुन पुढील तक्त्यात आपल्या व आपल्या अधिनस्त कार्यालयाची माहिती संकलित करुन विभागाची एकत्रित माहिती या विभागास पत्राद्वारे व ई-मेलद्वारे (email: vitthal.parihar@gov.in) कळवावी, ही विनंती.

| अ.क्र. | विभागाचे नाव | विभागाकडून पुरविण्यात येणाऱ्या सेवा/सुविधा | एकच पृष्ठांचे नमुने असलेल्या सेवा/सुविधा | २ किंवा २ पेक्षा जास्त पृष्ठांचे नमुने असलेल्या सेवा/सुविधा. |
|---|---|---|---|---|
| | | | | |

४. तसेच आपल्या विभागांकडून कागदपत्रांना साक्षांकित करून देण्याचे अधिकार ज्यांना देण्यात आले आहेत, ते मागे घेतले आहेत किंवा नाही याचीही माहिती या विभागास दि.२३ मार्च, २०१७ पर्यंत ई-मेलद्वारे (email: vitthal.parihar@gov.in) कळवावी, ही विनंती.

आपला,

(भगवान सहाय)

अपर मुख्य सचिव (प्र.सु. व र. व का.)

प्रत- निवडनस्ती (का.१८-अ)

| अ.क्र | विभागाचे नाव | विभागाकडून पुरविण्यात येणा-या सेवा/सुविधा | एकाच पृष्ठांचे नमुने असलेल्या सेवा / सुविधा | २ किंवा २ पेक्षा जास्त पृष्ठांचे नमुने असलेल्या सेवा/सुविधा |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

२) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५

| विभागाने अधिसूचित केलेल्या एकूण ऑनलाईन सेवा | अधिसूचित केलेल्या सेवांच्या बाबतीत एकही अर्ज ऑनलाईन प्राप्त न झालेले अथवा निर्णय न झालेल्या सेवांची संख्या | वा कालावधीत ऑनलाईन प्राप्त एकूण अर्ज | सेवा मागितलेले परंतु फेटाळले गेलेल्या अर्जांची संख्या | विहित कालावधीत सेवा उपलब्ध करून दिलेले अर्ज | विहित कालावधीत नंतर सेवा उपलब्ध करून दिलेले अर्ज | विहित कालावधीनंतर देखील प्रलंबित अर्ज | एकूण किती प्रथम अपील प्राप्त झाले | एकूण किती द्वितीय अपील प्राप्त झाले | लोकसेवा देण्यात कसूर केल्याबद्दल किती पदनिर्देशित अधिकाऱ्यांवर शास्ती लादली गेली आहे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |